प्रेस नोट दि.१०/१०/२०१८

दि.०९/१०/२०१८ रोजी मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, यांचे दिमतीत तपास पथकातील पोलीस उप निरीक्षक श्री विशाल चव्हाण व पोलीस उपनिरीक्षक श्री गज्जेवार तसेच पोलीस स्टाफसह लष्कर पो.स्टे.ला हजर असतांना **पो.हवा.१८३४ शैलेंद्र जगताप** यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली. की हॉटेल अरोरा टॉवर, एम.जी.रोड, कॅम्प पुणे येथे एक इसम कोकेन नावाचा अंमली पदार्थाची विक्री करण्यासाठी रात्रौ. २१/१५ ते २२/०० वा.चे दरम्यान येणार आहे. अशी खात्रीशिर बातमी मिळाल्याने सदरबाबत मा. सहा. पोलीस आयुक्त श्रीमती जयश्री गायकवाड यांचे आदेशाने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री चंद्रकांत भोसले यांचे दिमतीत पोलीस उपनिरीक्षक श्री चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक श्री गज्जेवार व लष्कर पोलीस ठाणे, मधील तपास पथकातील कर्मचारी यांनी बातमी प्रमाणे सापळा रचुन **इसम नामे नटराज गोपाळ, वय ३४ वर्षे, धंदा नोकरी, रा. २४१/१३ ढवळे वस्ती, ऊरळी देवाची, फुरसुंगी, ता. हवेली जि.पुणे.** यास हॉटेल अरोरा टॉवर, एम.जी.रोड, कॅम्प पुणे येथे सार्वजनिक रोडवर पकडुन त्याची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्याच्याकडे एकुण २३ ग्रॅम कि.रु. ८०,५००/- चा कोकेन नावाचा अंमली पदार्थ बेकायदेशीररित्या अनाधिकाराने विक्रीकरीता बाळगला असतांना मिळुन आल्याने त्याचेकडुन रोख ४०/- रुपये, एक एम.आय.कंपणीचा नोट-४ मोबाईल व सुझुकी मोटार सायकल क्रमांक एम.एच.१२ क्यु.व्हि.१५९० असा सर्व मिळुन कि.रु. **१,१५,५३०/- रुपये** चा माल हस्तगत केला असुन त्याचे विरुध्द पोलीस उपनिरीक्षक श्री विशाल दिलीप चव्हाण यांनी सरकारतर्फे एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क), २२(ब) प्रमाणे फिर्याद दिली असुन त्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री प्रसाद गज्जेवार हे करीत आहेत.

सदरची कामगीरी ही मा.पोलीस उप आयुक्त श्री बच्चन सिंग सो, परि.२ पुणे व मा.सहा.पोलीस आुयक्त जयश्री गायकवाड मॅडम लष्कर विभाग पुणे यांचे मार्गदर्शना खाली व वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री चंद्रकांत भोसले सो, तसेच पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री दिगंबर शिंदे यांचे नेतृत्वाखाली तपास पथकाचे पोलीस उप निरिक्षक श्री विशाल चव्हाण, पोलीस उप निरीक्षक श्री प्रसाद गज्जेवार, तपास पथकातील सहा.पोलीस उपनिरीक्षक राजेश सोनवणे, पो.हवा.१८३४ शैलेश जगताप, पो.हवा. ५८२६ गणपत थिकोळे, पो.हवा. ३१२५ प्रदिप शितोळे, पो.शि.७३३० अमोल राऊत, पो.शि.९८१५ पवन भोसले, पो.शि.९८२९ राहुल शिंगे, पो.शि.९८१८ सागर हुवाळे, पो.शि.९८२९ आबासाहेब धावडे, पो.शि. ८८०५ मुशरफ पठाण, पो.शि ९८२३ गणेश ओलेकर यांनी केलेली आहे.